# आकाशवाणी नागपूर,
# प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
# रविवार, दिनांक २६ मे २०२४

## ठळक बातम्या

1. **लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि अंतिम टप्प्यात सात राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या एकूण ५७ लोकसभा मतदारसंघांसाठी प्रचार सुरू.**
2. **प्रारूप मतदान अस्पष्ट असलेल्या नागपुरातील मतदान केंद्र क्र. 233 वर फेरमतदान घेण्याची काँग्रेसचे उमेदवार आमदार विकास ठाकरे यांची मागणी.**
3. **माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र-इयत्ता १०वी - परीक्षेचा निकाल उद्या दुपारी १ वाजता ऑनलाईन जाहीर करण्यात येणार.**

**आणि**

4. **बुद्ध पौर्णिमेच्या रात्री झालेल्या प्राणी गणनेत ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात आढळले तब्बल ५५ वाघ.**

*****

### सातवा टप्पा प्रचार सभा

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि अंतिम टप्प्यात, सात राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या, एकूण ५७ लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे. या मतदारसंघांत, पुढील महिन्याच्या एक तारखेला मतदान होणार असून, प्रचाराला वेग आला आहे. अंतिम टप्प्यातल्या प्रचारासाठी, भाजपचे ज्येष्ठ नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी आज उत्तर प्रदेशच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी मीरजापूर इथं प्रचारसभा घेतली. तर घुसी आणि बाजगाव इथंही, प्रचारसभेला ते संबोधित करणार आहेत. अखेरच्या टप्प्यासाठी विरोधी पक्षांचाही जोरात प्रचार सुरु आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी यांनी आज, हिमाचल प्रदेशच्या शिमला लोकसभा मतदारसंघां अंतर्गत, सिरमौर जिल्हयातील नाहान इथं, उमेदवार विनोद सुलतानपुरी यांच्या एका निवडणूक सभेला संबोधित केलं. राहुल गांधी आज हमीरपूर लोकसभा मतदारसंघां अंतर्गत, उना इथ एका निवडणूक रॅलीला देखील संबोधित करणार आहेत. समाजवादी पार्टीचे प्रमुख अखिलेश यादव, आम आदमी पार्टीचे प्रमुख आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल तसंच राष्ट्रीय जनता दलाचे नेते, तेजस्वी यादव यांनीही आज, आप-आपल्या उमेदवारांसाठी सभा घेतल्यात.

**विधान परिषद निवडणूक**

राज्यात विधानपरिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं काल, दोन उमेदवारांची घोषणा केली. मुंबई पदवीधर मतदारसंघातून, अनिल परब आणि मुंबई शिक्षक मतदारसंघातून, जे.एम.अभ्यंकर यांना पक्षानं उमेदवारी दिली आहे. विधानपरिषदेच्या चार जागांसाठी २६ जून रोजी मतदान होणार असून, मतमोजणी एक जुलै रोजी होईल.

**मॉक पोल/विकास ठाकरे**

मतदानाच्या दिवशी नियमानुसार, प्रत्येक मतदान केंद्रांवर सकाळी, साडेपाच वाजता मॉक पोलिंग अर्थात प्रारुप मतदान घेण्यात येतं. त्यानंतर कंट्रोल युनिटवरील क्लोज रिजल्ट क्लिअर करुन प्रत्यक्ष मतदानाला सुरुवात होत असते. मात्र प्राप्त माहितीनुसार, नागपुरातील मतदान केंद्र क्र.२३३, दादाजी धुनिवाले महानगरपालिका उच्च प्राथमिक शाळा, रविनगर या केंद्रावर मॉक पोलिंग क्लिअर न करताच मतदान घेण्यात आलं. या मतदान केंद्रावर एकूण ८६५ मतदान होते. त्यापैकी ३१५ जणांनी मतदान केल्याचे, १७-सी फॉर्मनुसार दिसून येत असून, यातही मॉक पोल किती आणि किती जणांनी मतदान केलं हे समजून येत नाही. 15 मे 2024 रोजीच्या पत्रानुसार चार जून रोजी होणाऱ्या मतमोजणीत, या केंद्रावरील मते मोजण्यात येणार नसल्याचं निवडणूक निर्णय अधिकाऱ्यानं जाहीर केलं आहे. तसंच व्हीव्हीपॅट स्लीपद्वारे अनिवार्य पडताळणीकरिता, निवडता येणाऱ्या पाच केंद्रांमध्येही, या केंद्राचा समावेश करता येणार नाही असंही, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी जाहीर केलं आहे. या मतदान केंद्रावर फेरमतदान घेण्यात यावं अशी मागणी इंडिया आघाडीतील भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अधिकृत उमेदवार, आमदार विकास ठाकरे यांनी केली आहे. तसंच लोकशाहीनं दिलेल्या मतदानाच्या अधिकारापासून नागरिकांना वंचित ठेवणाऱ्या निवडणूक अधिकाऱ्यावर कठोर कारवाईची मागणीही ठाकरे यांनी केली आहे.

**पोर्श कार दुर्घटना**

पुण्यातील कल्याणी नगर वाहन अपघात प्रकरणी, अल्पवयीन आरोपी मुलाचे आजोबा, सुरेंद्र अगरवाल यांना काल पोलिसांनी अटक केली असून, न्यायालयाने चार दिवसांची पोलिस कोठडी ठोठावली आहे. मुलासोबत असलेल्या चालकाला धमकावणं आणि, डांबून ठेवणं आदी आरोप त्यांच्यावर आहेत. तर कल्याणीनगर

अपघात दुर्घटनेची, पुनरावृत्ती होऊ नये म्हणून, यवतमाळ आणि गोंदियामध्ये वाहतूक पोलिसांनी वेगानं गाड्या चालविणाऱ्या अल्पवयीन मुलांवर कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. अल्पवयीन मुला-मुलींच्या हातात दुचाकी, चारचाकी वाहनं देण्याचं प्रमाण वाढलं असून, परवाना नसणं, नियमबाह्य पद्धतीनं वाहन चालविणं, मोठ्यानं आवाज करणारे सायलेन्सर, हॉर्न आदी वाहनांवर, दंडात्मक कारवाया सुरू केल्या आहेत. मध्यरात्री सुद्धा पोलीस विभागानं ही मोहीम सुरू ठेवली असून, वाहनांची कसून तपासणी सुरू आहे. दरम्यान मुंबईतसुद्धा जे अनधिकृत पब आणि बार असतील त्यावर कारवाई करण्याच्या सूचना, पोलिसांना दिल्या आहेत. ठरवून दिलेल्या अवधीपेक्षा जे पब किंवा बार अधिक काळ सुरु असतील अशांवर सुद्धा कारवाई होणार असल्याची माहिती, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते.

**१०वी निकाल**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत मार्च-२०२४ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल उद्या दुपारी एक वाजता ऑनलाईन जाहीर करण्यात येणार आहे. मंडळाच्या विविध संकेतस्थळांवर हा निकाल बघता येईल. गुणपडताळणीसह, गुणपत्रिका छायाप्रतींसाठी, २८ मे पासून ११ जूनपर्यंत, संकेत स्थळावरच ऑनलाइन पद्धतीनं अर्ज सादर करता येईल. तर यावर्षी जुलै-ऑगस्टमध्ये आयोजित पुरवणी परीक्षेसाठी, ३१ मे पासून संकेतस्थळावरून ऑनलाइन अर्ज भरता येईल.

**प्राणी गणना**

दरवर्षी बुद्ध पौर्णिमेच्या रात्री प्राणी गणना करण्यात येते. या अनुषंगानं, २३ मे रोजी झालेल्या चंद्रपूर जिल्ह्याच्या ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील वन्यजीव गणनेची माहिती जाहीर करण्यात आली आहे. प्रकल्पाच्या कोअर आणि बफर क्षेत्रात मिळून, ५५ वाघ, १७ बिबटे, ८६ रानकुत्री, ६५ अस्वलं, एक हजार ४५८ चितळ, ४८८ सांबर, ५५९ गवे अशा, एकूण पाच हजार ६९ मांसभक्षी आणि तृणभक्षी प्राण्यांची नोंद झाली आहे. यासाठी बफर क्षेत्रातील एकूण सहा वनपरिक्षेत्रांत, ७९ मचाणं उभारण्यात आली होती. एकूण १६० निसर्गप्रेमींनी, क्षेत्रीय वन कर्मचाऱ्यांच्या सोबत ही प्राणीगणना केली. त्याचप्रमाणे बुलढाणा जिल्ह्यातील विस्तीर्ण अशा ज्ञानगंगा

अभयारण्यात देखील, बुद्ध पौर्णिमेच्या रात्री, चंद्राच्या प्रकाशात प्राणी गणना करण्यात आली. यावेळी झालेल्या प्राणी गणनेत, ज्ञानगंगा अभयारण्यात तब्बल २० बिबट आणि ३३ अस्वलांसह अनेक वन्य प्राण्यांची नोंद करण्यात आली आहे.

**अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पुरस्कार**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे व्यावसायिक आणि प्रायोगिक नाटकांसाठीचे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. यात 'नियम आणि अटी लागू' या नाटकासाठी, व्यावसायिक मराठी रंगभूमीवरील सर्वोत्कृष्ट लेखकाचा आणि सर्वोत्कृष्ट अभिनेता पुरस्कार, संकर्षण कऱ्हाडे यांना तर, दिग्दर्शकाचा पुरस्कार, चंद्रकांत कुलकर्णी यांना जाहीर झाला आहे. यावर्षी मराठी रंगभूमीवरील सर्वोत्कृष्ट व्यावसायिक नाटक म्हणून देखील, 'नियम आणि अटी लागू' या नाटकाला पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. तर प्रायोगिक रंगभूमीवरील सर्वोत्कृष्ट संगीत नाटक पुरस्कार, 'संगीत जय जय गौरीशंकर' नाटकाला आणि सर्वोत्कृष्ट प्रायोगिक नाटक पुरस्कार 'i m पुंगळ्या शारूक्या आगीमहूळ' या नाटकाला जाहीर करण्यात आला. तर प्रायोगिक रंगभूमीवरील सर्वोत्कृष्ट लेखक पुरस्कार, इरफान मुजावर यांना जाहीर करण्यात आला आहे. सर्व पुरस्कार प्राप्त कलावंतांना १४ जून रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यसंकुल, मनमाला टँकरोड, मांटुगा-माहीम इथं, पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती, नाट्य परिषदेचे अध्यक्ष, प्रशांत दामले यांनी दिली आहे.

**चक्रीवादळ रेमाल**

बंगालच्या उपसागराच्या उत्तर भागात उद्भवलेल्या, 'रेमाल' या  चक्रीवादळाची तीव्रता पश्चिम बंगालमधल्या सागर बेटाच्या दक्षिण आग्नेयेला सुमारे २७० किलोमीटरवर वाढल्याचं, हवामान विभागानं कळवलं आहे. हे चक्रीवादळ आज मध्यरात्री, ताशी ११० ते १२० किलोमीटर वेगानं बांग्लादेश आणि जवळच्या पश्चिम बंगालमधील प्रदेशात आदळेल. यावेळी ताशी १३५ किलोमीटर वेगानं वारे वाहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. रेमाल चक्रीवादळाचा संभाव्य धोका लक्षात घेऊन कोलकाता विमानतळावरची वाहतूक आज दुपारपासून पुढच्या एकवीस तासांसाठी, स्थगित करण्यात आली असून, एकूण ३९४ देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय उड्डाणं रद्द करण्यात आली आहेत. रेमाल चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर भारतीय नौदलानं तत्काळ आणि प्रभावी मदत पुरवण्यासाठी पूर्वतयारी सुरू केली असून, यात बाधित लोकांसाठी आपत्ती निवारण प्रतिसाद आणि वैद्यकीय पुरवठा, तत्काळ तैनात करण्यासाठी दोन जहाजे सज्ज केली आहेत. या व्यतिरिक्त, सी-किंग आणि चेतक

हेलिकॉप्टर तसंच डॉर्नियर विमानं देखील जलद प्रतिसादासाठी तयार ठेवण्यात आली आहेत.

**हवामान**

अकोल्यात काल ४५.६ अंश सेल्सिअल इतकं उच्चांकी तापमान नोंदविल गेलं. तर यवतमाळमध्ये ४५.५ अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली. उच्चांकी तापमान नोंदविणारा विदर्भात, अकोल्यानंतर यवतमाळ दुसरा जिल्हा ठरला असून, यवतमाळमध्ये यापूर्वी २९ आणि ३० मे २०१९ ला ४५.५ अंश सेल्सिअस एवढ्या तापमानाची नोंद आहे तर, १७ मे १९८९ ला, ४६.६ अंश सेल्सिअस एवढं तापमान नोंदविलं गेलं होतं. नागपुरात काल ४१ पूर्णांक सात अंश सेल्सिअस इतकं तापमान नोंदविलं गेलं. गोंदिया जिल्ह्यातील पालेवाडा इथं विहीर आटल्यानं पाणी टंचाईची समस्या तीव्र बनली असून, पाण्यासाठी महिला शेत शिवारानं पायपीट करताना दिसत आहेत. दरम्यान, पुढील दोन दिवस चंद्रपूर आणि अकोला इथले तापमानात वाढ होण्याची शक्यता असून, उन्हाची तीव्रता लक्षात घेता प्रशासनानं खबरदारीचा ईशारा दिला आहे. उन्हाच्या तापमानापासून भाविकांना दिलासा मिळावा यासाठी नागपुरातील भाविकांचे आराध्य असलेल्या, गणेश टेकडी मंदिर इथं, कुलिंग सिस्टीम प्लांट लावण्यात आला, ज्यामुळ नागरिकांचे उन्हापासून संरक्षण होत असून, भाविकांना या कुलिंग सिस्टिममुळे काही प्रमाणात थंडावा मिळत आहे. दरम्यान, विदर्भातील चंद्रपूर, वर्धा, वाशीम, यवतमाळ, अमरावती आणि नागपूर जिल्ह्यांत काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याचा वारा आणि हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता, हवामान खात्यानं वर्तविली आहे.

**टाटा मुलभूत संशोधन संस्था**

टाटा मुलभूत संशोधन संस्था आणि होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राद्वारे, 'विज्ञान विदुषी २०२४' भौतिकशास्त्र कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. टाटा मूलभूत संशोधन संस्था आणि होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राद्वारे, २०२० पासून, 'विज्ञान विदुषी' हा तीन आठवड्यांचा, निवासी कार्यक्रम सुरु आहे. वर्ष २०२४ मध्ये हा उपक्रम, होमी भाभा केंद्रामध्ये, २७ मे ते १५ जून या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे. भौतिकशास्त्रात पीएचडी.च्या संशोधनासाठी पुरुष संशोधकांबरोबर, महिला संशोधकांना प्रोत्साहन आणि पाठबळ देणं, असा हेतू या उपक्रमामागे असून, यासाठी देशाच्या निरनिराळ्या भागांतून एम.एससी.ला प्रवेश

घेतलेल्या विद्यार्थिनींकडून अर्ज मागविण्यात आले होते. त्यांपैकी ४६ विद्यार्थिनी 'विज्ञान विदुषी २०२४' या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

******